**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भिवंडी तालुका, भिवंडी यांचे कार्यालय**

जकात नाका, सेंट्रल हॉस्पीटलच्या वरती, दत्तात्रय कृपा बिल्डींग, तिसरा मजला, ता. भिवंडी, जि. ठाणे

६८३६

जा.क्र. सनिभि/बी-१/कलम ८८/जयहिंद पत./सन २०१७.

दिनांक :- ३१/०३/२०१७.

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये

# आदेश

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतुद

२) श्री. यु. एस. अहिरे, विशेष लेखापरिक्षक वर्ग -२ सहकारी संस्था (प्रक्रिया) ठाणे यांचा दिनांक ०६/०५/२०१४ चा प्रशासकिय विशेष अहवाल.

३) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. सनिभि/बी-२/कलम ८८/जयहिंद पत./२०३७/ सन २०१६ दिनांक १९/१२/२०१६

ज्याअर्थी, **जयहिंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. युसुफ रमझान हौसिंग, ४ था निजामपुरा, आग्रारोड, भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत सहकारी पतसंस्था असून ती या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येते आणि,

ज्याअर्थी, जयहिंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. भिवंडी, जि. ठाणे या संस्थेचे दिं. ०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१२ या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण श्री यु. एस. अहिरे, विशेष लेखापरिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (प्रक्रिया) ठाणे यांनी केले असून सदर कालावधीच्या लेखापरिक्षणाचा प्रशासकिय विशेष अहवाल त्यांनी दि. ०६/०५/२०१४ रोजी सादर केला असून सदर विशेष लेखापरिक्षण अहवालात त्यांनी संस्थेच्या कामकाजात सभासदांच्या ठेवीच्या रक्कमा परत करण्यास निधीची कमतरता, संस्थेचे व्यवहार पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी पारदर्शकपणे न करणे. कायदा कानुन व पोटनियमाचे सर्रास उल्लंघन करुन कर्ज वितरण करणे, कमी दराने व्याज आकारणी अशा प्रकारच्या संस्थेच्या कामकाजात गंभीर बाबी व त्रुटी निदर्शनसा आल्या असल्याचे अहवालात नमुद करुन संस्थेस १,७६,३३,५००/- इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार व आर्थिक नुकसान झाल्याचे नमुद केलेले आहे. सदर नुकसानीस जबाबदार असणाऱ्या तत्कालीन व्यवस्थापक समिती सदस्याकडुन आकारणी करण्याची शिफारस विशेष लेखापरिक्षक यांनी केलेली आहे आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या तत्कालीन सदस्यांनी पिग्मी ठेव तारण कर्जे, कमी जास्त दराने व्याज आकारणी संचालक व त्यांचे नातेवाईक यांचे कडील कर्जे, कर्मचारी व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जे अशा प्रकारची कर्जे वितरित करुन संस्थेस आर्थिक नुकसान झालेले असून सदर नुकसानीची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनात भाग घेतलेले तत्कालीन समिती सदस्याची व कर्मचारी यांची असून सदर नुकसानीची आकारणी करणे व नुकसानीची व्याजासह भरपाई करणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे आणि,

ज्याअर्थी, संदर्भिय क्रमांक ३ अन्वये सदर संस्थेची कलम ८८ अन्वये चौकशी करण्यासाठी श्री. एस. के. पांचगे यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु त्यांनी चौकशी करण्यास नकार दिला आहे. सदर संस्थेची चौकशी मुदतीत पूर्ण करणे आवश्यक असल्यामुळे या कार्यालयाचे दिनांक १९/१२/२०१६ च्या आदेशात बदल करणे आवश्यक आहे आणि;

त्याअर्थी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे.
20 APR 2017

Scanned by CamScanner

## : आदेश :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी सुदाम काठे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भिवंडी **जयहिंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. युसुफ रमझान हौसिंग, ४ था निजामपुरा, आग्रारोड, भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे** या संस्थेच्या व्यवस्थापनात भाग घेतलेले तत्कालीन व्यवस्थापक समिती सदस्य यांनी संस्थेच्या निधीचे केलेले उपयोजन, अपहार, त्यांनी केलेले अपकार्य व विश्वास घात व त्यामुळे संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीची आकारणी करुन व्याजासह भरपाईची रक्कम निश्चित करण्यसाठी प्रधिकृत अधिकारी म्हणुन **श्री एस. के. पाचंगे, निवृत्त सहाय्यक निबंधक** यांची दिनांक १९/१२/२०११६ च्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली होती. परंतु सदर आदेशामध्ये अंशःता बदल करुन त्यांच्या ऐवजी **श्री. एस. एन. साळुंखे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (१) ठाणे** अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे यांची नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी परिशिष्ठ अ प्रमाणे संस्थेस झालेल्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करुन भरपाईची रक्कम वसुली संदर्भात आवश्यक ते आदेश दयावेत व सदरची चौकशी त्यांनी ६ महिन्याचे कालावधीत पुर्ण करावी. तसेच सदरच्या चौकशी कामी रु. १०,०००/-(अक्षरी रुपये दहा हजार मात्र) चौकशी फी मंजूर करण्यात येत आहे.

सदर आदेश आज दि. ३१/०३/२०१७ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह देण्यात येत आहे.

( सुदाम काठे )
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, भिवंडी**

Scanned by CamScanner